International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# रिद्धपूर : महानुभाव संत स्पर्शभूमी व मराठी भाषेची आधारभूमी

**डॉ.अण्णा वैद्य**
*मराठी विभाग, श्रीमती नरसम्मा महाविद्यालय, अमरावती*
*Corresponding Author – डॉ. अण्णा वैद्य*
**DOI - 10.5281/zenodo.15245260**

**प्रस्तावना :**

विदर्भ प्रदेश हा ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रदेश आहे. या प्रदेशाची पूर्वापार चालत आलेली संस्कृती ही तेवढीच उन्नत व प्रगत म्हणून नावारूपास आली आहे. विदर्भाची सांस्कृतिक भूमी म्हणून अमरावती जिल्ह्याला विशेष महत्त्व आहे. अमरावती जिल्हयाला संपन्न व समृद्ध असा ऐतिहासिक वारसा आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये संत परंपरेतील महानुभाव पंथाच्या तीन महत्त्वाच्या अवतारांचे वास्तव्य राहिले आहे. म्हणूनच रिद्धपूर गावाला महानुभाव पंथाची काशी मानल्या जाते.रिद्धपूर या नगराचे उल्लेख वेगवेगळ्या प्राचीन ग्रंथांमध्ये प्रामुख्याने आलेले आहेत. तेराव्या शतकापासून या नगरात निवासाला असणाऱ्या श्रीगोविंद प्रभू यांच्या समग्र जीवनाचे अस्सल पुरावे त्यांच्या चरित्र ग्रंथातून आले आहेत. त्यात रिद्धपूर यांचा जागोजागी उल्लेख आहे. तेराव्या शतकातील मराठी भाषा संदर्भात उपलब्ध पुराव्याचा आधार घेऊन मराठी भाषेतील समीक्षक संशोधक वसंत आबाजी डहाके यांचे विधान या ठिकाणी महत्त्वाचे वाटते *यादवांपासून शिवशाही पर्यंत म्हणजे तेरावे शतकापासून सतराव्या शतकापर्यंत जवळजवळ पाच शतकांचा कालखंड मराठी संतांच्या कार्याने आणि लेखनाने व्यापलेला आहे"*[१] तेराव्या शतकात मराठी भाषेच्या लेखनाचीची सुरुवात महानुभावीय संत व लेखक मंडळींच्या कार्यकर्तृत्वाने सिद्ध झाली आहे. या लेखन कार्याची मुहूर्तमेढ रोवली गेली ती रिद्धपूर नगरात. या नगरीचे विशेष महत्त्व मराठी भाषेच्या संदर्भात मान्य झाले आहे म्हणूनच आज मराठी भाषेचे विद्यापीठ हे रिद्धपूर या गावी शासनाने घोषित केले आहे.

**श्रीगोविंदप्रभू आणि रिद्धपूर :**

तेराव्या शतकात महानुभाव पंथाची मुहूर्त मेढ श्रीचक्रधर स्वामींनी रोवली त्यांचे गुरु श्रीगोविंदप्रभू हे आहेत श्री चक्रधर स्वामी आणि श्री गोविंद प्रभू यांच्यातील नात्याला अधोरेखित करताना समीक्षक संशोधक डॉअविनाश आवलगावकर सर विधान करतात की, *" महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर स्वामी यांचे शके ११४२ मध्ये महाराष्ट्रात आगमन झाले आणि त्यांनी रिद्धपूर येथे जाऊन महानुभावांचे चतुर्थ कृष्ण श्रीगोविंदप्रभू यांचे दर्शन घेतले त्यांच्याकडून त्यांनी परावर शक्तीचा स्वीकार केला"*[२] रिद्धपूर या नगराला श्रीगोविंदप्रभू यांनी कर्मभूमी मानले. हा महानुभाव पंथीय विचारधारेनुसार चौथा ईश्वरी अवतार आहे. असे महानुभाव वाङ्मयाच्या आधारे सिद्ध करता येते. श्रीगोविंदप्रभू यांनी ईश्वरीय सामर्थ्याच्या आधारे तत्कालीन समाजासमोर स्वतः ईश्वर असल्याचे सिद्ध केले आहे. त्यांनी अनेक दुःखी जणांची दुखे हरण केली. दिन दुबळ्यांचे अश्रू पुसले अनेकांच्या संकटाला धावून गेले. तत्कालीन सामाजिक

परिस्थितीमध्ये जातीभेदाची तीव्रता लक्षात घेऊन बहुजन, शूद्र व स्त्रीयांना त्यांनी आत्मीयतेने, आत्मसन्मानाने वागवले. त्यांच्यातील एक सदस्य म्हणून ते त्यांच्यासोबत राहिले वेळोवेळी अशा बहुजनांवर आलेल्या संकटांना सामोरे जाऊन त्यांचे दुःख निवारण करीत त्यांना आधार दिला. त्याच वेळेला सवर्णीयांना खडसावून त्यानी आपल्या कृतीतून उत्तरही दिले. यावरून गोविंदप्रभू हे सर्व समाजाचा विचार करणारे, दिन दुबळया, दलितांचा, स्त्रियांचा विचार करणारे, सर्वजीवांना समान भूमिकेतून बघणारे महान विचारवंत व कृतिशील सामाजिक सेवक होते असे म्हणता येते . त्यांच्या कार्याची विशेष नोंद घेता येते. त्यांच्या सहवासात दीर्घकाळ श्री नागदेव व म्हाइभट्ट होते. म्हाइभट्ट यांनी श्रीगोविंदप्रभूंच्या सर्व लीळा एकत्रित करून ‘श्रीगोविंदप्रभू चरित्र’ हा ग्रंथ १२८८ मध्ये लिहिला. हा ग्रंथ तेरावे शतकातील विदर्भातल्या रिद्धपूर परिसरातल्या घटनांची नोंद घेणारा ग्रंथ नसून समग्र तत्कालीन विदर्भ प्रांताच्या संदर्भात मुख्य दस्तऐवज रूपाने आज उपलब्ध असलेले ग्रथ आहे. या ग्रंथामध्ये श्रीगोविंदप्रभू यांच्या जीवनातील बहुतांश घटनांच्या नोंदी आलेल्या आहेत.

श्रीगोविंदप्रभू चरित्रात साडेतीनशेच्या च्यावर लीळा एकत्रित केल्या गेलेल्या आहेत. त्या आधारे श्रीगोविंद प्रभू यांचे चरित्र संक्षिप्त रूपाने आपल्यासमोर मांडता येते. श्रीगोविंदप्रभू यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात असणाऱ्या काटसूर येथे झाला होताश्री गोविंद प्रभू यांचे आई वडील फार काळ जगले नाही. मामांनी वयाच्या आठव्या वर्षी गोविंदप्रभू यांना रिद्धपूरला आणले. त्यावेळी रिद्धपूर येथे अध्ययनासाठी ची वेद शाळा होती ब्राह्मण समूहात असणाऱ्या मुलांना या वेधशाळेतून अध्ययनाचे पाठ दिले जात होते त्या वेधशाळेत श्री गोविंद प्रभू यांना दाखल करण्यात आले.त्यापुढील संपूर्ण आयुष्य रिद्धपूर येथेच गेले. अमरावती जिल्हयातील काही निवडक गावी प्रभूचे वास्तव्य झाले. महानुभाव पंथाच्या तत्वज्ञाना प्रमाणे ईश्वराचे जे अवतार घेण्याचे प्रकार आहे त्यापैकी श्री. गोविंदप्रभू यांचा ईश्वर अवतार होय. हा ‘दवडण्याचा अवतार’ होता. वेडसर व्यक्तीप्रमाणे त्यांचे आचरण असायचे. ते यात्रेकरूच्या सोबत द्वारकेला गेले व तेथे वास्तव्यास असलेल्या श्रीचांगदेव राऊळांकडून संन्यास घेतला व समाजकार्याची दीक्षा घेतली. रिद्धपूरला परत आले. आपल्या गुरु प्रमाणे श्रीप्रभू यांनी सामान्य जनांची सेवा कार्य सुरु होते. ते आजन्म ब्रह्मचारी होते. अनासक्तवृत्ती, सर्वाभूती समत्व, क्षमाशीलवृत्ती, त्यांच्या जवळ भेदाभेद नव्हता. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद विकोपाला गेला होता, अस्पृश्यता जात होती. शुद्र-बहुजन वर्गाचे सवर्णीयांनी सारेच हक्क व अधिकार हिरावून घेतल होते. त्यांना गुलाम बनविले होते. बहुजन शुद्र समाज अत्यंत हीन शूद्र पातळीवरचे जीवन कंठीत होता. या वेळी शुद्रांची व्यथा प्रभूना कळली म्हणून स्वतः ब्राह्मण असूनही त्यांना शुद्र बहुजनांशी लळा होता, प्रेम होते. त्यांच्या विषयीची कणव असलेल्या प्रभूनी शुद्र बहुजनावरील अनेक संकटे निवारली. म्हणून बहुजन त्यांना 'राऊळ मायः राऊळ बापूः' म्हणायचे

श्रीप्रभू रिद्धपुरात कुणाच्याही घरी जायचे. मातंग, हरिजन, ब्राह्मण, तेली अशी विविध जाती धर्माच्या लोकांमध्ये त्याचा वावर होता. एका ब्राह्मणाने शुद्रांघरी जाणे तेव्हा हिंदू आचार परंपरेला विरोध करणारे होते. परंतु प्रत्यक्ष कृती करून श्री प्रभूनी जातिभेदाला तिलांजली दिली. मातंगाच्या घरी जावून ते नियमितपणे त्याच्या प्रेमाने तयार कैलेल्या हुरडा-सोले व भाकरीचा आस्वाद घ्यायचे. एका तेल्याच्या घरी गेले असता तो तेली म्हणाला' आम्ही शुद्र आहोत. आपणाला आमची ही भाकरी चालणार कशी त्यावर प्रभू म्हणाले, 'भाकरी काई तेलियाची' यावरून त्यांना स्पृश्यास्पृश्य हा भेद मान्य नव्हता असे दिसते. सावळापूरच्या सुनेची लीळा सर्वश्रुत आहेच. आपले आईवडिल जरी नसले तरी सर्वाचे दुःख दूर करणारे असे गोविंदप्रभू तिला “ राऊळ माव राऊळ

बापू’ वाटतात व ती स्वतः येवून प्रभूच्या सहवासात राहते. श्रीप्रभू तिला मुलीच्या प्रेमाने वागवतात. येणाऱ्या जावायाचाही अपमान करीत नाही. वावरून त्यांच्या अंतःकरणात स्त्री - शुद्राविषयीचा किती जिव्हाळा होता हे लक्षात येते. या सर्व घटना रिद्धपूरात घडल्या. १२ व्या शतकात स्त्रियांच्या दुःखाला त्यांच्यावरील अन्यायाला अवरोध करण्याचे कार्य श्रीप्रभूनी केले. ही त्या काळातील क्रांतिकारी घटना होती. अडचणीत सापडलेल्यांना मदतीचा हात देणे हे श्रीप्रभू चे कार्य होते. मातंग वस्तीत पिण्याचा पाण्याचा दुष्काळ पडला तेव्हा गावातील सवर्ण लोक त्यांना पाणी भरु देत नव्हते, ते सर्व मातंग श्रीप्रभूकडे आलेत, त्यांची विनवणी श्रीप्रभूनी ऐकली. आपल्यातील सामर्थ्याने गावाबाहेर एक जागा दाखविली. ‘एथ खोदा’ असे म्हटले आणि त्या ठिकाणी विहीर खोदली तिला पाणी लागले. ती विहीर आजही शुद्रांच्या उध्दाराचे प्रतीक म्हणून रिद्धपूर येथे अस्तित्वात आहे.. श्रीप्रभूंची बुद्धी कुशाग्र होती. त्यांनी श्रीचक्रधरांना गुरु म्हणून उपदेश दिला. सेवाकार्य व जीवोध्दरण कार्य पुढे चालविण्याचा वसा श्रीचक्रधरांकडे हस्तांतरित केला.

श्रीप्रभूचे हे समाजपरिवर्तनाचे कार्य असामान्य असे होते. अनेकांना त्यांनी जीवदान दिले. जातियता मोडून काढली. दुःखातून सर्वसामान्यांना मुक्त करणे, मुलांमध्ये रमणे, रांधवण हाटामध्ये जावून क्रीडा करणे इ. लीळा श्रीप्रभू रोज करायचे . म्हाइंभट यांनी त्या सर्व लीळा लिहून काढल्या..श्रीचक्रधरांचा शिष्य परिवार चक्रधरांच्या उत्तरापंथे गमनानंतर रिद्धपुरामध्ये येवून राहू लागला. श्री. प्रभूनी या परिवाराला आश्रय दिला. म्हाइंभट्ट यांनी श्री प्रभूकडे येवून पंथाची दीक्षा घेतली. श्री. प्रभूची त्यांनी सेवा केली. पुढे नागदेवाचार्य यांच्या सहकार्याने गोविंदप्रभूच्या सान्निध्यात श्री चक्रधरांच्या लिळाचे संकलन करून 'लीळाचरित्र' ग्रंथाचे लेखन रिद्धपूर येथे वांजेश्वरी या ठिकाणी सुरु झाले. मराठी भाषेतला आद्य ग्रंथ इ.स. १२७८ मध्ये निर्माण झाला. या ग्रंथांच्या निर्मितीमध्ये रिद्धपूर या गावाचे, तिथल्या माहात्म्यांच्या परिश्रमाचे मोलाचे सहकार्य आहे. हे नाकारता येत नाही. अखील मराठी भाषेचा आद्य ठेवा रिद्धपूर परिसरातून तो जतन केल्या गेला विस्तारला या महानुभाव संप्रदायाच्या जाणकार महंत मंडळींनी पुढे नागदेव आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या ग्रंथांचा अभ्यास करून स्वतंत्र नव्याने ग्रंथरचना केली आपली ही ग्रंथरचना मुस्लिमांच्या काळात चोरल्या जाऊ नये म्हणून त्यांनी वेगवेगळ्या लिप्यांमध्ये ही संपदा उतरविली सकळ लिपी सुंदर लिपी अशा लिपींमध्ये हे हजारो ग्रंथ रूपांतरित केल्या गेले आज मठांमधून या रूपांतरित ग्रंथांच्या पोते आहेत रिद्धपूर या गावात असे पन्नास आश्रम आहेत ज्या आश्रमांमधून लिप्या व पोत्या संग्रहित केल्या आहेत हा वारसा जतन करणारी महानुभाव आश्रम संस्था ही रिद्धपूर व महाराष्ट्रात अन्य ठिकाणी आहेत मराठी भाषेला सांभाळणारा हा संप्रदाय व पंथ आहे असे म्हणता येते. श्री गोविंद प्रभू चरित्र ग्रंथात आलेल्या लीळा या तत्कालीन भाषेतल्या लीळा आहेत त्यावेळेस बोलल्या जाणाऱ्या मराठीच्या वेगवेगळ्या बोली त्यात समाविष्ट आहेत या ग्रंथाची भाषिक महत्त्व विशद करताना डॉ. वि. भी. कोलते लिहितात की, *“श्रीगोविंदप्रभू चरित्राची भाषा ज्ञानेश्वरकालीन मराठी गद्याची असल्यामुळे सर्वसाधारणपणे तत्कालीन बहुतेक व्याकरण विशेष प्रस्तुत ग्रंथात आढळतात”*[3].

या ग्रंथात तत्कालीन समाजाची बोलण्याची दैनंदिन व्यवहाराची बोली आहे. म्हाइंभट हे संस्कृत पंडित जरी असले तरी त्यांनी मात्र श्रीप्रभूच्या लीळा शब्दबद्ध करीत असताना त्यांनी कुठेही पंडित त्यात येऊ दिले नाही. साध्या भोळ्या सामान्यांच्या भाषेला श्रीगोविंदप्रभू चरित्रातून अक्षरबद्ध केल्या गेले. श्रीगोविंदप्रभू चरित्र या ग्रंथाचे नव्याने संपादित आवृत्ती प्रकाशित झाली असून श्रीब्रह्मविद्या पाठशाळा तरडगाव संपादित “ऋद्धपूर चरित्र” या ग्रंथाच्या प्रस्तावनेत संपादकीय मंडळींनी नोंदवलेला तपशील

विचारात घेणे या ठिकाणी महत्त्वाचे वाटते, *“ बाराव्या शतकातील विदर्भ जीवनाचे सत्यप्रत विश्वसनीय दर्शन आढळणाऱ्या या प्रस्तुत ग्रंथात श्रीप्रभूंचं निरामय जीवन मनाला सुखावून जातं रिद्धपुरातील घडलेले चमत्कार हे परोपकारी बुद्धीने घडलेले दिसतात त्यात स्वार्थाचा लवलेश आढळत नाही उलट श्रीप्रभूचं वात्सल्य व त्यांना असलेला जनसामान्याबाबतचा कळवळा आढळतो”* [४] श्रीगोविंदप्रभू ही व्यक्तिरेखा समाजापर्यंत पोहोचविणे हे खरे कार्य या पंथातील संपादक म्हाइंभट यांचे होते. म्हाइंभट यांच्या लेखणीने ते समर्थपणे पेलेले आहे.

**श्रीचक्रधर स्वामी आणि रिद्धपूर :**

श्रीचक्रधर स्वामी यांनी अवतार स्वीकारल्यानंतर आपले कार्यक्षेत्र महाराष्ट्रामध्ये निश्चित केले. त्यासाठी त्यांनी अमरावती जिल्हयात आधीच अस्तित्वात असलेल्या अवताराचे गुरुत्व स्वीकारणे श्रीचक्रधर गुजरात येथून जेव्हा महाराष्ट्रात आले . अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर हे त्याकाळी मोठी बाजारपेठ होती. श्रीचक्रधरांनी श्रीप्रभूची दीक्षा घेतली, आशीर्वाद घेतला व पुढच्या कार्याला सुरुवात केली. सालबर्डी येथे जाऊन तपसाधना केली नंतर स्वामी इतरत्र भक्तांच्या भेटी घेत वारंग प्रांतात व डोंगराळ आदिवासींच्या सहवासात काही काळ राहून ते महाराष्ट्रात परतले महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर पासून सुकळी डाकराम भंडारा जिल्ह्यापर्यंत त्यांना पायी प्रवास केला या प्रवासात त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र जाणून घेतला समाज संस्कृती धर्म राज्य सत्ता या सर्वांचा परिचय त्यांना झाला होता बहुजनांचे सुद्रांचे स्त्रियांचे अनेक प्रश्न होते ती सर्व माणसे अज्ञानी होती त्यांना ज्ञानाचा मार्ग मोकळा करून देणे कर्म प्राप्त होते आणि म्हणून सर्वज्ञ श्री चक्रधरांनी अशा बहुजन मधल्या काही निवडक भक्तांना जीव उद्धारक असे तत्त्वज्ञान निरूपण केले. स्वतंत्र तत्त्व विचार नव्याने समाजासमोर ठेवला हा त्यांचा विचार लीळाचरित्रात प्रतिबिंबित झाला असून सूत्रपाठ रूपाने महानुभाव पंथाच्या तत्व निरूपण ग्रंथात तो समाविष्ट आहे हा तत्व विचार म्हणजेच महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान होय. श्री चक्रधर महाराष्ट्रात भ्रमंती करत असताना त्यांनी श्री गोविंद प्रभू यांची रिद्धपूर येथे येऊन भेट घेतली. दुसऱ्या भेटीमध्ये दाभेरी, बेलोरा या गावी प्रवास करीत स्वामी रिद्धपूरामध्ये दाखल झाले. श्रीचक्रधर व श्रीप्रभू यांची भेट रिद्धपूर गावाच्या जवळ असलेल्या पिवळ तळयावर झाली. दोघांनी मातंगाच्या घरचे अन्नग्रहण केले.

श्रीचक्रधरांचा जास्त सहवास हा अचलपूर चा राजा रामदरणा राजा यांच्या दरबारी झाला. ते ९ महिने अचलपूरच्या दरबारी स्वेच्छेने राहिले. त्यावेळी रामदरणा राजाने श्रीचक्रधरांच्या सेवेसाठी गरुड घोडा दिला. सोबत सेवक व चाकर दिलेत. अचलपूर परिसरातील अनेक वाडे, घरे, घाट वस्त्यांमध्ये श्रीचक्रधर राहिलेत. जीवोध्दरण हे ध्येय असलेल्या स्वामी यांनी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये भ्रमंती करून शिष्य परिवारांना प्रेमदान दिले. श्रीचक्रधराच्या या कार्याला समाजसेवेचे, उध्दाराचे, अधिष्ठान होते. ते विरक्त वृत्तीचे होते. आपली धनसंपत्ती राजवैभव सोडून त्यांनी महाराष्ट्रात येवून समाजसेवाकार्य केले. आपल्या अमोघ वाणीतून तत्वज्ञान सांगितले. दृष्टांताचा आधार घेतला. श्रीचक्रधरांनी जातिपाती अस्पृश्यता पाळली नाही. सर्व जीव सारखेच आहे, हे त्यांच्या तत्वज्ञानातून दिसते. वर्णभेद, वर्गभेद त्यांनी नाकारला, स्त्रियांची शोषणापासून सुटका केली. स्त्रियांना धार्मिक अधिकार दिला. मोक्षाचा अधिकार बहाल केला. 'पुरुषांचा जीव आणि स्त्रियांचा काई जीऊलीयाः' असे म्हणत स्त्री-पुरुष भेद नाकारित महदंबेला त्यांनी आपले पूर्वायुष्य सांगितले. श्रीप्रभूच्या प्रेरणेने महदंबा गीत रचू लागली. तिने धवळे गायीले हेच मराठी भाषेतील पहिले पद्य होय. ह्या सर्व घटनांचे साक्षीदार रिध्दपूर आहे अमरावती जिल्हा आहे. सातपुड्याच्या पायथ्यासी या आठशे वर्षापूर्वी घडलेल्या घटनांनीसमाजपरिवर्तनाची आधारशिला रोवल्या गेली. ज्यावर आज महाराष्ट्राचे पुरोगामित्व डौलाने नांदत आहे. समाजातील शोषित

समूहाला ज्ञान देणे, त्यांची मुक्तता करणे त्याला संघर्षात पाठबळ प्राप्त करून देणे. त्याच्यातील स्वाभिमानाला जागृत करून त्याला सन्मानप्राप्त करून देण्याचे महत्वाचे कार्य श्रीचक्रधरांनी केले.

हिंदू धर्माच्या अद्वैतवादी विचाराला फाटा देवून एकेश्वरवादी विचाराची मुहूर्तमेढ स्वामींनी रोवली. देवताभक्तीला विरोध करीत इतर कर्मकांड बुवाबाजीला विरोध करीत नवी धार्मिक शुद्ध विचारांची मांडणी श्रीचकधरांनी आपल्या तत्वज्ञानातून केली. श्रीचक्रधरांचे हे तत्वज्ञान वैदिकांच्या विचारधारेला धक्का देणारे होते. त्यामुळे वैदिक धर्मभीमानी असणाऱ्यांनी श्रीचक्रधराचा विरोध केला. श्रीचक्रधरांचा मोठा शिष्य परिवार विदर्भ प्रदेशात होता व आजही आहे. श्रीचक्रधरांनी समाजाला दिलेली नैतिक शिकवण ही मोलाची व महत्वाची आहे. श्रीचक्रधरांनी कर्मकांडाचा विरोध केला, व्यसनांचा धिक्कार केला, शोषण परंपरेला विरोध केला. महाराष्ट्राला शुद्ध आचरण करणारा करुणा, भक्ती, मैत्री, समता, सात्विकता असलेला महानुभाव पंथ चक्रधरामुळे मिळाला. आज या पंथाची विचारधारा आत्मसात करणारा समाज हा संपूर्ण महाराष्ट्रासह आंध्र, कर्नाटक, गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, पंजाब, हरियाणा, जम्मू प्रदेशावर, बुदेलखंड, अफगाणिस्तान पर्यत पोहचला आहे. या सर्व प्रदेशामध्ये हा पंथ विस्तारला हे सर्व भाविक श्रद्धाळू लोक रिद्धपूरला आवर्जून येतात. येथे येवून आपले मस्तक रिद्धपूरच्या मंदिरामध्ये येवून झुकवितात.
अमरावती जिल्ह्यातील बहुतांश गावी हा पंथ विस्तारला आहे. अनेक प्रकारचे उत्सव पंथीय मंडळीचे सुरु असतात. एक प्रकारचे धार्मिक, सांस्कृतिक वातावरण या प्रदेशात पहावयास मिळते. एक धार्मिक संस्कृतीची जपवणूक हा संप्रदाय करतो आहे.

**निष्कर्ष:**

- मराठी ही महाराष्ट्र प्रदेशात अडीच- तीन हजार वर्षांपूर्वीपासून बोलली जाणारी बोलीभाषा, लोकभाषा, ज्ञानभाषा आहे.
- तेराव्या शतकात विदर्भामध्ये रिद्धपूर येथे महानुभाव पंथातील महंत व संत यांनी मराठीभाषेच्या विकासासाठी प्रयत्न केले
- श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर या दोन महानुभाव संतांनी समाजउद्धार, समाजपरिवर्तन, मराठी भाषेबद्दलची आस्था व अस्मिता या संदर्भात विशेषत्वाने कार्य केले.
- रिद्धपूर येथे श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर स्वामी या दोन्ही महापुरुषांचे चरित्र म्हाइंभट यांनी लिहिले आज मराठी भाषेचे विद्यापीठ याच रिद्धपूरात स्थापन झाले आहे.

**संदर्भ :**


१. डहाके वसंत आबाजी, 'संत साहित्य आकलन आणि अध्यापन', संपादक - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, डिसेंबर - २०११ , प्रास्ताविक् पृष्ठ (एक)

२. आवलगावकर अविनाश, संत साहित्य आकलन आणि अध्यापन, (या ग्रंथातील महानुभाव संप्रदाय आणि साहित्य - हा लेख)महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च मध्यमिक शिक्षण मंडळ - पुणे, डिसेंबर २०११, पृष्ठ- २

३. कोलते,वि. भी. श्री गोविंद प्रभू चरित्र हाऊस पुणे स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती सहावी मे २००० ,
पृष्ठ- ३६

४. नितीन राज महानुभाव,"ऋद्धपूर चरित्र" , संपादक, श्रीब्रह्मविद्या पाठशाळा, तरडगाव जि. सातारा, राजयोग, प्रकाशन श्री ब्रह्मविद्या निकेतन, सवत्सर जि अहमदनगर. प्र आ. २०१५, पृ ५